## -: प्रेसनोट दिनांक - १३/०८/२०२४ :-

**आरोपी लोकसेवक १) तुषार महादेव सोनवणे, पद - परिरक्षण भुमापक सज्जा टोप, उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय हातकणंगले, रा.बामणोली, ता.मिरज, जि. सांगली, मुळ रा. आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली, २) अमर विक्रम चौगुले, खाजगी इसम, रा. शिवाजी तालीमजवळ, हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार यांचे वडीलार्जीत मालमत्ता मधील एका मालमत्तेचे प्रॉपर्टी कार्डवरती वारसाप्रमाणे वारसा नोंदी सिटी सर्व्हे ऑफीस टोप येथील कार्यालयाकडुन झालेल्या आहेत. त्यानंतर तक्रारदार यांच्या अन्य एका मालमत्तेचे प्रॉपर्टी कार्डवरती वारसाप्रमाणे वारसा नोंदी करणेसाठी तक्रारदार विचारणा करणेस सिटी सर्व्हे कार्यालयात गेले त्यावेळी तक्रारदार कार्यालयातील श्री सोनवणे यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे कार्यालयातील खाजगी उमेदवार अमर चौगले यांना भेटण्यास सांगितले. त्यावेळी चौगुले यांनी तक्रारदार यांना तुमचे यापुर्वी प्रॉपर्टीच्या वारस नोंदीचे काम करून दिले म्हणुन तसेच नविन प्रॉपर्टीचे कामामध्ये वारस नोंद करणेसाठी दोन्ही कामाचे मिळुन १०,०००/- रूपये दयावे लागतील नाहीतर तुमचे नविन प्रापर्टीचे वारसा नोंदीचे काम करण्यास अडचण होईल असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना काहीतरी रक्कम कमी करण्यास विनवणी केली तेव्हा त्यांनी नकार दिला व लवकर पैसे देण्यास त्यांनी सांगीतले असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केली.

तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आलोसे क. ०२ यांनी तक्रारदार यांना आलोसे क.०१ यांनी त्यांचे एक काम पुर्ण केले तसचे नविन काम पुर्ण करून देणेसाठी आलोसे क. ०१ यांचेसाठी १०,०००/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती ७,०००/- रूपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले तसेच आलोसे क. ०१ यांनी तक्रारदार यांचेकडे आलोसे क.०२ यांनी मागणी केले लाच रक्कमेस दुजोरा देवुन त्यांनीही तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती ४,०००/- रूपयांची लाच मागणी केल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक १) तुषार महादेव सोनवणे, पद - परिरक्षण भुमापक सज्जा टोप, उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय हातकणंगले यांनी ४,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले. तसेच २) अमर विक्रम चौगुले, खाजगी इसम, रा. शिवाजी तालीमजवळ, हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी पकडणेत आले आहे.

सदरबाबत **आरोपी लोकसेवक १) तुषार महादेव सोनवणे, पद - परिरक्षण भुमापक सज्जा टोप, उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय हातकणंगले, रा.बामणोली, ता.मिरज, जि. सांगली, मुळ रा. आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली, २) अमर विक्रम चौगुले, खाजगी इसम, रा. शिवाजी तालीमजवळ, हातकणंगले, जि.कोल्हापूर** यांचेविरूध्द एमआयडीसी शिरोली, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्रीमती डॉ. शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री बापु साळुंके, पोलीस निरीक्षक, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.कोल्हापूर, सपोफौ श्री प्रकाश भंडारे, श्री सुनिल मोरे, पो.हे.कॉ श्री विकास माने, सुनिल घोसाळकर, पो.ना.सुधीर पाटील, चा.पो.हे.कॉ. गजानन कुराडे अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३) श्री.बापु साळुंके, अति.कार्यभार पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ७३०४७६९२३०. कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**